# महाराष्ट्र शासन
# कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग,
# शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परीसर, अमरावती - 444 604

Email – jdheamt@yahoo.com web – jdheamravati.org

**JDAMT-NGC0SENI(AMT)/145/2025-EST / 1164666** दिनांक **09.2025**

प्रति,
संबंधित सर्व प्राचार्य,
अशासकीय अनुदानित महाविद्यालय,
अमरावती विभाग अमरावती

विषय : अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती नंतर त्यांना मिळणाऱ्या उपदानातून (आ.प्र.योजनेची) कपात करण्यात आलेल्या रकमेबाबत
संदर्भ : 1) शा.नि.क्रं.संकिर्ण 2016/(262/16)/विशी-1 दिनांक 07/12/2018
2) शा.नि.क्रं.संकिर्ण 2016/(262/16)/विशी-1 दिनांक 31/05/2023
3) संचालनालयाचे परिपत्रक दिनांक 16/07/2024

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ संदर्भ क्रं.2 नुसार देय नसल्याचे शासन स्तरावरून आदेशित असल्यामुळे त्यांचे सेवानिवृत्ती वेतनाचे तात्कालीन वेळी सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मा. महालेखाकार कार्यालय , नागपूर यांचेकडे अग्रेषित करताना त्यांना देय होणाऱ्या सेवानिवृत्ती वेतनाच्या लाभातून (उपदानाच्या रकमेतून) तत्कालीन वेळी आश्वासित योजनेनुसार दर्शविण्यात आलेली राशि अतिप्रदान दर्शवून तसा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मा. महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात येत होता.

परंतू शा.नि.क्रं.संकिर्ण2016/(262/16)/विशी-1 दिनांक 31/05/2023 नुसार व संदर्भ क्रं.3 संचालनालयाच्या परिपत्रकानुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यासंदर्भात सुचित केले असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांचे उपदानातून अतिप्रदान म्हणून वसूल करण्यात आलेली आश्वासित प्रगती योजनेची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यासदंर्भातील प्रस्ताव मा. महालेखाकार नागपूर या कार्यालयास कळविण्याबाबत मा. संचालनलयाच्या परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्रं.2 च्या शासन निर्णयानुसार तसेच संदर्भ क्रं.3 च्या मा. संचालनालयाच्या परिपत्रकानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देय असलेल्या आश्वासित प्रगती योजनेचे लाभ उपदानाच्या रकमेतून वसूल न करता अतिप्रदान दर्शविण्यात आलेली रक्कम संबंधितास अदा करण्याचे आदेश असल्याने ज्या कर्मचाऱ्यांच्या उपदानाच्या रकमेतून अतिप्रदान वसूली कपात करण्यात आली त्या

महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे कपातीची रक्कम संबंधितास अदा करणेबाबत महालेखाकार कार्यालयास विनंती करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त आदेशानुसार सदर प्रकरणी प्रस्तुत कार्यालयाकडून उचित कार्यवाही करण्याकरीता आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांचे सदर योजनेअंतर्गत उपदानाच्या मंजूर रकमेतून अतिप्रदान वसूलीची कपात करून उर्वरित अदा करण्यात आलेली रक्कमेबाबतचे बँक स्टेटमेंट, चालनद्वारे अतिप्रदान रक्कम भरणा केली असल्यास चालनाची सत्यप्रत , महालेखाकार कार्यालयाचे उपदान मंजूर आदेशाची सत्यप्रतासह प्रस्तुत कार्यालयास खालील तक्त्यानुसार माहिती सादर करावी. जेणेकरून संबंधित कर्मचाऱ्यांस रक्कम अदा करणेबाबतची कार्यवाही करणे शक्य होईल.

| अनु.क्र | महाविद्यालयाचे नाव | कर्मचाऱ्यांचे नाव | उपदानाची मंजूर रक्कम | अतिप्रदान रक्कम | अदा करण्यात आलेली रक्कम | रक्कम प्राप्त दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |

Digitally signed by
ABHAY KAMLAKAR KHAMBORKAR
Date: 21-03-2025 11:36:05

**(डॉ. अभय खांबोरकर)**
सहसंचालक उच्च शिक्षण
अमरावती विभाग अमरावती